नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १२३ Issue - 123 | वार - सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ Blow- Monday Date 28 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सरकारी बँकांचा तीन दिवसीय देशव्यापी संप स्थगित

## युनियनच्या बैठकीत निर्णय; ग्राहकांना मोठा दिलासा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सरकारी बँकांचा २८ ते ३० सप्टेंबर या काळात होणारा देशव्यापी संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या संदर्भात इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) आणि युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (यूएफबीयू) यांची एक बैठक झाली. त्यामध्ये झालेल्या चर्चेनंतर यूएफबीयूने संप मागे घेतल्याचे जाहीर केले. ही माहिती यूएफबीयूने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात रविवारी रात्री दिली. तीन दिवसीय संप पुढे ढकलला गेल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पाच दिवसांचा आठवडा

दोन्ही संघटनांच्या बैठकीत संपकरी बँकांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही समिती प्रामुख्याने पाच दिवसांच्या आठवड्याबाबत निर्णय घेईल. ही समिती सर्व पर्यायांचा अभ्यास करेल, संबंधितांशी चर्चा करेल आणि निर्णय घेईल, असे या निवेदनात नमूद करण्यात आले.चतुर्थ श्रेणीतील तसेच त्यावरील अधिकाऱ्यांसाठी त्यांच्या कामगिरीवर आधारित पीएलआय योजना काढून टाकावी अशी मागणी होती.

'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स'ने (यूएफबीयू) रविवारी सांगितले की, 'इंडियन बँक्स असोसिएशन' (आयबीए) सोबत त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत सहमती झाल्यामुळे त्यांनी आपला प्रस्तावित तीन दिवसांचा देशव्यापी संप पुढे ढकलला आहे.

'एएनआय'ने दिलेल्या माहितीनुसार, २७ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकात यूएफबीयूने म्हटले आहे की, बँक कर्मचाऱ्यांसाठी सर्व शनिवार सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर करण्याच्या मागणीवर विचार करण्यासाठी त्वरित समिती स्थापन केली जाईल. ही समिती संभाव्य पर्यायांची पडताळणी करेल, सर्व संबंधित घटकांशी चर्चा करेल आणि ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देऊन सर्व पक्षांना मान्य होईल असा तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करेल, असे यूएफबीयूने सांगितले.

स्केल फोर अधिकाऱ्यांसाठी पीए-लआय

दोन्ही बाजूंनी 'स्केल ४' आणि त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी 'परफॉर्मन्स लिंक्ड इन्सेंटिव्ह' (पीए-लआय) योजनेवर चर्चा सुरु करण्यासही सहमती दर्शवली. या चर्चेदरम्यान युनियन्सच्या मुद्द्यांचा विचार केला जाईल आणि सरकारकडे ते मांडून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जाईल.

परिपत्रकानुसार, ८ मार्च २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केलेले उर्वरित मुद्देही लवकरात लवकर सोडवण्यासाठी हाती घेतले जातील. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित आंदोलने आणि संप पुढे ढकलण्याबाबत यूएफबीयूने सहमती दर्शवली असे युनियन्सनी म्हटले.

हा प्रस्तावित संप सोमवारपासून तीन दिवसांसाठी नियोजित होता आणि त्याचा परिणाम बँकिंग सेवांवर, विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील बँका, जुन्या पिढीतील खाजगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांवर होण्याची शक्यता होती.

युनियन्सनी प्रामुख्याने 'पाच दिवसांचा बँकिंग आठवडा' लागू करण्याच्या मागणीसाठी हा संप पुकारला होता. यासोबतच पेन्शनचे लाभ, पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता आणि 'नॅशनल पेन्शन सिस्टम' (एनपीएस) अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'जुनी पेन्शन योजना' (ओपीएस) स्वीकारण्याचा पर्याय मिळणे या मागण्यांचाही त्यात समावेश होता.

या मागण्यांसाठी ११ सप्टेंबर रोजी एक दिवसाचा देशव्यापी बँक संपही करण्यात आला होता. बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या सात युनियन्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स'ने जर हे मुद्दे सुटले नाहीत तर २६ ऑक्टोबरपासून बेमुदत संप करण्याचा इशाराही दिला होता. अर्थ मंत्रालयाने या आठवड्याच्या सुरुवातीला बँक कर्मचाऱ्यांना आवाहन केले होते की, त्यांनी चर्चेद्वारे उर्वरित मुद्दे सोडवावेत आणि बँकिंग सेवा अखंडित ठेवाव्यात. मंत्रालयाने म्हटले होते की, युनियन्सच्या बहुतेक समस्यांचे बऱ्याच अंशी निवारण करण्यात आले आहे आणि झडख-संबंधित मागणी या महिन्याच्या सुरुवातीलाच स्थगित ठेवण्यात आली होती.

# दुष्काळ यादीत समावेश न झालेल्या तालुक्यांची तपासणी करणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यात अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये समावेश न झालेल्या तालुक्यांची तपासणी करून ट्रिगर तीन अंतर्गत मदत देण्यात येईल, दुष्काळी परिस्थितीमध्ये मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती व शासनातर्फे जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत मुख्यमंत्री श्री. फडणवीस आज माध्यमांसोबत बोलत होते. पर्जन्यमानाची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली असून, या तालुक्यांमध्ये १२ उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतपिकाच्या नुकसानीची मदत विहित कार्यपद्धतीची पूर्तता करून दिली जाईल अशी ग्वाही देताना मुख्यमंत्री म्हणाले की, ज्या तालुक्यांचा समावेश झाला नाही अशा सर्व तालुक्यांची तपासणी करून ट्रिगर तीनमध्ये समावेश करण्यात येईल.

**दुष्काळी परिस्थितीचा सामना करताना मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्याचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात येईल. राज्यातील बहुतांश प्रकल्पात पिण्याचे पाणी उपलब्ध असून जुलै-ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याचे आरक्षण ठेवून अतिरिक्त उपलब्ध असलेले पाणी व पाण्याच्या उपलब्धतेनुसार रब्बीसाठी देता येईल का याचाही प्राधान्याने विचार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अल निनोमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करण्यात येऊन फेब्रुवारीअखेरपर्यंत उच्चांक पातळी गाठण्याची शक्यता आहे, अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्राधान्याने पूर्ण करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. दुष्काळी परिस्थितीचा सामना करताना जनतेनेही सहकार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की अनावश्यक खर्च टाळून दुष्काळग्रस्त भागांमध्ये कशी मदत करता येईल, ती सर्वांनी करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड येथे छत्तीसगडमध्ये आलेल्या अतिवृष्टीमुळे पुराची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पूर परिस्थितीमध्ये प्रशासनातर्फे संपूर्ण मदत देण्यात येत असून मी प्रशासनाच्या सातत्याने संपर्कात असल्याचे सांगताना पूर परिस्थिती निवळत असून जनजीवन पूर्वपदावर येत असल्याचे यावेळी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



# छटपूजा, दिवाळीसाठी मुंबई-पुण्यातून यूपी-बिहारसह विविध ठिकाणी ४१८ विशेष रेल्वे गाड्या, गोरखपूरला ६४ फेऱ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी दिवाळी, दुर्गापूजा आणि छठपूजेच्या तोंडावर आपापल्या राज्यात जाणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. सणासुदीच्या काळात होणारी प्रचंड गर्दी आणि कन्फर्म तिकिटांची अडचण लक्षात घेता मध्य रेल्वेने ४१८ विशेष ट्रेन फेऱ्या चालवण्याची घोषणा केली आहे.

मुंबई, पुणे आणि नागपूर या प्रमुख शहरांतून उत्तर प्रदेश, बिहार, दक्षिण भारत तसेच महाराष्ट्राच्या अंतर्गत भागांत जाणाऱ्या प्रवाशांसाठी या विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. या गाड्यांमुळे लाखो प्रवाशांचा सणांमधील प्रवास सुखकर आणि सुखद होणार आहे.

कोणत्या मार्गांवर धावणार गाड्या?

मध्य रेल्वेने उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली आणि महाराष्ट्रातील अंतर्गत शहरांसाठी खालीलप्रमाणे विशेष ट्रेनचे नियोजन केले आहे,

मुंबई ते गोरखपूर (ऊळश्र डशि-ळलरश्र) : उडचढ वरून दररोज सुटणारी ट्रेन (०१०७९/०१०८०) एकूण ६४ फेऱ्या पूर्ण करेल. ही गाडी दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, भुसावळ, भोपाळ, झाशी, कानपूर आणि लखनौ मार्गे गोरखपूरला पोहोचेल.

लोकमान्य टिळक टर्मिनस - मऊ व बनारस : एलटीटी ते मऊ (०११२३/०११२४) आणि एलटीटी ते बनारस (०१०५१/०१०५२) या दोन्ही मार्गांवर आठवड्यातून २ दिवस विशेष गाड्या चालवल्या जातील (प्रत्येकी २४ फेऱ्या).

हडपसर (पुणे) - गोरखपूर : पुण्यातील हडपसर स्थानकावरून गोरखपूरसाठी (०१४१५/०१४१६) दररोज विशेष ट्रेन धावेल (एकूण ६४ फेऱ्या).

मुंबई - चेन्नई आणि बंगळुरू : मुंबई उडचढ वरून चेन्नई बीच (०१०१५/०१०१६) आणि डचतढ बंगळुरू (०१०१३/०१०१४) साठी साप्ताहिक वातानुकूलित (उ) विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील प्रमुख शहरांसाठी विशेष गाड्या

राज्याच्या अंतर्गत प्रवासासाठी देखील रेल्वेने विशेष सोय केली असून खालील मार्गांवर गाड्या धावतील,

सीएसएमटी- लातूर : आठवड्यातून दोन दिवस विशेष ट्रेन (२६ फेऱ्या).

सीएसएमटी - नागपूर : साप्ताहिक सुपरफास्ट विशेष ट्रेन (१२ फेऱ्या).

सीएसएमटी - कोल्हापूर : साप्ताहिक विशेष ट्रेन (१२ फेऱ्या).

तिकीट बुकिंग कधीपासून सुरू?

या सर्व विशेष गाड्यांसाठीचे तिकीट बुकिंग २७ सप्टेंबर २०२६ आणि २८ सप्टेंबर २०२६ पासून टप्प्याटप्प्याने सुरू होत आहे. प्रवासी खठडढ च्या अधिकृत संकेतस्थळावरून, मोबाईल पवरून किंवा रेल्वे स्टेशनवरील पीआरएस काउंटरवरून आपले तिकीट आरक्षित करू शकतात.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना नॅशनल ट्रेन इन्क्वायरी सिस्टीम ॲप किंवा अधिकृत पोर्टलवरून गाड्यांची अचूक वेळ आणि थांब्यांची माहिती तपासूनच प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे.

**राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांच्या मुख्यमंत्र्यांकडे १७ मोठ्या मागण्या**

# प्रत्येक कुटुंबांला २५ किलो मोफत धान्य ते प्रतिहेक्टर १ लाख रुपये अनुदान द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्यातील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवलं आहे. या पत्रात त्यांनी १७ मागण्या केल्या आहेत. शरद पवार यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेलं पत्र देखील शेअर केलं आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांना तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांना पत्राद्वारे १७ मागण्या करत आहोत, असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

शेती व शेती व्यवसायासाठी घेतलेली सहकारी, राष्ट्रीयीकृत, अर्बन बँका व पतसंस्थांची कर्जमाफी, जमीन महसूल व कृषी वीजबिल माफी, प्रतिकुटुंब २५ किलो मोफत धान्य, थेट आर्थिक मदत, शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १ लाख रुपये आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान, तहसीलदारांना टँकर मंजुरीचे अधिकार देऊन पिण्याचे व जनावरांचे पाण्याची तातडीने उपलब्धता, रोजगार हमीची कामे, जलसंधारणासाठी विशेष निधी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी, वसतिगृह फी आणि मेस फी माफी तसेच फळबाग व पिकांच्या नुकसानीची भरपाईची मागणी महाराष्ट्र शासनाकडे केली आहे, अशी माहिती शरद पवारांनी दिली.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी विधिमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून, दसरा-दिवाळीपूर्वी शेतकरी व शेतमजुरांना मदत देण्यात यावी, अशीही मागणी ह्या पत्राद्वारे करीत आहे, असं शरद पवारांनी सांगितलं.

दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांना तातडीने दिलासा मिळणं आवश्यक आहे. त्यांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करून या मागण्यांची शासनाने तातडीने अंमलबजावणी करावी, ही विनंती, अशी भूमिका शरद पवारांनी मांडली आहे.

शरद पवारांनी केलेल्या १७ मोठ्या मागण्या

राज्यातील वंचित राहिलेले तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात यावेत.

संपूर्ण जमीन महसूल माफ करावे.

कर्जमाफी झालेल्या तारखेनंतर आजतागायत ज्या शेतकऱ्यांनी शेती व शेती व्यवसायाशी निगडीत घेतलेल्या सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक, सहकारी अर्बन बँका आणि पतसंस्था तसेच सामाजिक न्याय, अल्पसंख्याक, आदिवासी विभागाचे वैयक्तिक कर्ज, तसेच फळबागांसाठी घेतलेले कर्ज आणि महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची रक्कम पूर्णपणे माफ करण्यात यावी.

शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची सर्व वीज बिले माफ करण्यात यावीत.

दुष्काळग्रस्त भागातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांची वसतिगृह फी आणि मेस फी पूर्णपणे माफ करण्यात यावी.

रोजगार हमी योजनेतील सध्याचे निकष शिथिल करुन, मागेल त्या ठिकाणी तीन किलोमीटरच्या परिसरात तातडीने रोजगाराची कामे सुरु करण्यात यावीत.

पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर करण्याचे अधिकार तहसीलदारांना देवून त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी.



टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांच्या कृषीपंपांची वीज खंडीत करु नये. तसेच दुष्काळग्रस्त भागात कोणत्याही प्रकारचे लोडशेडिंग करण्यात येऊ नये.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबाना प्रतिकुटुंब २५ किलो धान्य सरसकट मोफत देण्यात यावे.

दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व शेतमजूरांकडील पशूधनासाठी थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदान जमा करण्यात यावे.

जलसंधारण कामे सुरु करण्यासाठी सध्याचे निकष शिथिल करुन विशेष निधी उपलब्ध करुन ही कामे तातडीने सुरु करण्यात यावीत.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती तीव्रता लक्षात घेता, शेतकऱ्यांना प्रती हेक्टर एक लाख आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान तातडीने त्यांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात यावे.

दुष्काळामुळे फळबागा, केळी, ऊस, आणि धान यांचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी.

ज्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना शासनाद्वारे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत तातडीने आदेश निर्गमित करण्यात यावे.

शेतकरी अथवा शेतमजूर यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रलंबित असलेली थकीत देयेके व त्यांच्यावरील अनुदान तातडीने वर्ग करण्यात यावे.

दुष्काळ निवारण्यासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने वर्ग करण्यात यावा.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, महाराष्ट्राच्या विधीमंडळाचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावून दुष्काळ परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात यावी व आवश्यक उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात यावेत. तसेच या अधिवेशनात झालेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करुन, नुकसानग्रस्त शेतकरी व शेतमजुरांना दसरा व दिवाळीपूर्वी आवश्यक आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यांमध्ये वितरीत करण्यात यावी.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ 

## संपादकीय....

### ग्राहकांना दिलासा

सरकारी बँकांचा २८ ते ३० सप्टेंबर या काळात होणारा देशव्यापी संप स्थगित करण्यात आला आहे. संपाच्या संदर्भात इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) आणि युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स (यूएफबीयू) यांची एक बैठक झाली. त्यामध्ये झालेल्या चर्चेनंतर यूएफबीयूने संप मागे घेतल्याचे जाहीर केले. तीन दिवसीय संप पुढे ढकलला गेल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दोन्ही संघटनांच्या बैठकीत संपकरी बँकांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही समिती प्रामुख्याने पाच दिवसांच्या आठवड्याबाबत निर्णय घेईल. ही समिती सर्व पर्यायांचा अभ्यास करेल, संबंधितांशी चर्चा करेल आणि निर्णय घेईल, असे या निवेदनात नमूद करण्यात आले.चतुर्थ श्रेणीतील तसेच त्यावरील अधिकाऱ्यांसाठी त्यांच्या कामगिरीवर आधारित पीएलआय योजना काढून टाकावी अशी मागणी केली होती. 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स'ने (यूएफबीयू) रविवारी सांगितले की, 'इंडियन बँक्स असोसिएशन' (आयबीए) सोबत त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत सहमती झाल्यामुळे त्यांनी आपला प्रस्तावित तीन दिवसांचा देशव्यापी संप पुढे ढकलला आहे. 'एएनआय'ने दिलेल्या माहितीनुसार, २७ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकात यूएफबीयूने म्हटले आहे की, बँक कर्मचाऱ्यांसाठी सर्व शनिवार सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर करण्याच्या मागणीवर विचार करण्यासाठी त्वरित समिती स्थापन केली जाईल. ही समिती संभाव्य पर्यायांची पडताळणी करेल, सर्व संबंधित घटकांशी चर्चा करेल आणि ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देऊन सर्व पक्षांना मान्य होईल असा तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करेल. दोन्ही बाजूंनी 'स्केल ४' आणि त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी 'परफॉर्मन्स लिंक्ड इन्सेंटिव्ह' (पीएलआय) योजनेवर चर्चा सुरु करण्यासही सहमती दर्शवली. या चर्चेदरम्यान युनियन्सच्या मुद्द्यांचा विचार केला जाईल आणि सरकारकडे ते मांडून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जाईल. परिपत्रकानुसार, ८ मार्च २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नमूद केलेले उर्वरित मुद्देही लवकरात लवकर सोडवण्यासाठी हाती घेतले जातील. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित आंदोलने आणि संप पुढे ढकलण्याबाबत यूएफबीयूने सहमती दर्शवली. हा प्रस्तावित संप सोमवारपासून तीन दिवसांसाठी नियोजित होता आणि त्याचा परिणाम बँकिंग सेवांवर, विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील बँका, जुन्या पिढीतील खाजगी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांवर होण्याची शक्यता होती. युनियन्सनी प्रामुख्याने 'पाच दिवसांचा बँकिंग आठवडा' लागू करण्याच्या मागणीसाठी हा संप पुकारला होता. यासोबतच पेन्शनचे लाभ, पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता आणि 'नॅशनल पेन्शन सिस्टम' (एनपीएस) अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'जुनी पेन्शन योजना' (ओपीएस) स्वीकारण्याचा पर्याय मिळणे या मागण्यांचाही त्यात समावेश होता.

# दरेगाव येथे जिओ टॉवरची रेंज सातत्याने गायब; डिझेलअभावी जनरेटर बंद असल्याने ग्रामस्थ आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : दरेगाव आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून जिओ (गळे) मोबाईल नेटवर्कची सेवा अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहे. नेटवर्कची रेंज वारंवार जात असल्याने नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि शेतकऱ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. टॉवरवर बॅकअपसाठी सोलर आणि जनरेटरची यंत्रणा उपलब्ध असतानाही केवळ डिझेलअभावी जनरेटर बंद राहत असल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ही समस्या तात्काळ न सुटल्यास जिओचा टॉवर पूर्णपणे बंद पाडू, असा थेट इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

**वीज जाताच नेटवर्क ठप्प; सुविधेचा फज्जा**

आजच्या डिजिटल युगात शिक्षण, बँकिंग व्यवहार, शेतीविषयक कामे आणि शासकीय योजनांसाठी इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क अत्यंत आवश्यक झाले आहे. मात्र, दरेगाव येथील जिओ टॉवरच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

महावितरणचा वीज पुरवठा खंडित होताच टॉवरची रेंज पूर्णपणे गायब होते. टॉवरच्या ठिकाणी सोलर पॅनेल आणि जनरेटर बसवण्यात आले आहेत. परंतु, कंपनी प्रशासनाकडून जनरेटरसाठी वेळेवर डिझेलचा पुरवठा केला जात नाही. परिणामी वीज गेल्यावर जनरेटर धूळ खात पडून राहतो आणि सोलर यंत्रणा पुरेशी पडत नसल्याने नेटवर्क पूर्णपणे बंद होते.

**विद्यार्थी, व्यापारी व नागरिकांचे हाल**

शिक्षणावर परिणाम: ऑनलाइन

> **हजारो रुपयांचे रिचार्ज नागरिकांकडून करून घेते, मग जनरेटरसाठी डिझेल पुरवण्यासारख्या मूलभूत सेवेत हलगर्जीपणा का? बॅकअप यंत्रणा असूनही त्याचा वापर होत नसेल, तर असा टॉवर गावात ठेवून उपयोग काय?**
>
> **– संतप्त ग्रामस्थ दरेगाव**

अभ्यास करणारे विद्यार्थी व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांना नेटवर्कअभावी मोठा फटका बसत आहे.

व्यापार व ऑनलाइन व्यवहार ठप्प: दैनंदिन ऑनलाइन पेमेंट, यूपीआय (UPI) व्यवहार आणि बँकिंग कामे रखडत आहेत.

य आणीबाणी: आपत्कालीन किंवा वैद्यकीय प्रसंगी नातेवाईकांशी अथवा रुग्णवाहिकेशी संपर्क साधणेही कठीण झाले आहे.

**कंपनीच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थ आक्रमक**

स्थानिक नागरिकांनी आणि प्रतिनिधींनी या समस्येबाबत जिओ कंपनीच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे अनेकदा तोंडी तक्रारी केल्या. मात्र, या तक्रारींकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

**इशारा**

कंपनीने येत्या दोन ते तीन दिवसांत टॉवरच्या जनरेटरसाठी नियमित डिझेल पुरवठ्याची सोय करावी आणि नेटवर्कची रेंज कायमस्वरूपी सुरळीत करावी. अन्यथा दरेगाव येथील सर्व नागरिक एकत्र येऊन जिओ टॉवरला टाळे ठोकतील



आणि टॉवरचे कामकाज पूर्णपणे बंद पाडतील, असा कडक इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

### मारुती खारवे, दादासाहेब बनसोडे, सत्येंद्र राऊत , ज्ञानेश्वर बनसोडे यांना पुरस्कार प्रदान

# समाजसेवा, पत्रकारिता व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : समाजातील विविध क्षेत्रांत निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नांदेड येथील प्रबुद्ध परिवार टेम्पल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मान्यवरांना पुरस्कार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले




या सोहळ्यात धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते नळदुर्ग नगरीचे नगरसेवक तथा गटनेते मारुती सुदाम खारवे यांना समाजरत्न पुरस्कार,पत्रकार तथा बौद्धाचार्य दादासाहेब दुष्यंत बनसोडे यांना पत्रकारिता पुरस्कार, प्रा. सत्येंद्र राऊत यांना आदर्श शिक्षक पुरस्कार, तर ज्ञानेश्वर कुंडलिक बनसोडे यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी दैनिक प्रबुद्ध परिवाराच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी बोलताना दैनिक प्रबुद्ध परिवाराचे संपादक संजय खाडे म्हणाले की, विवेक व बुद्धीला अनुसरून समाजामध्ये कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती आपली प्रतिष्ठा पणाला लावून सामाजिक परिवर्तनासाठी काम करीत असतात. अशा मान्यवरांच्या कार्याचा सन्मान झाल्यास त्यांना पुढील कार्यासाठी प्रेरणा मिळते. प्रेरणेतून बदल घडतो आणि बदलातून समाजात सकारात्मक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते.

या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध मान्यवरांचा गौरव करण्यात आला. आपल्या कार्याची समाजाकडून दखल घेतली जात असल्याची भावना पुरस्कारार्थींनी व्यक्त केली.

यावेळी पत्रकारिता विद्यालयाचे प्राचार्य विकास कदम नगरसेविका गायकवाड , सामाजिक कार्यकर्त्या अनिता बेंद्रे कवि वारे अदिच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

समाजिक , सांस्कृतिक , धार्मिक ,शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकांना त्यांच्या मेहनतीचे योग्य फळ मिळते आणि जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजे . कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते .

# वृत्तलेखन ही एक कला असून ते फक्त माहिती देणे एवढेच पूर्ती मर्यादित राहिले नाही संवादाचे माध्यम बनले आहे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वृत्तलेखन ही एक कला असून ते फक्त माहिती देणे एवढ्या पुरते मर्यादित राहिले नाही तर आता संवादाचे माध्यम बनले आहे. असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंबादास भासके यांनी केले. तर वृत्तलेखनामध्ये स्पष्टपणा, परखडपणा, आणि लोकहिताचे प्रश्न मांडल्यास ते लेखन जन माणसात लोकप्रिय होते. असे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर चे सहाय्यक प्राध्यापक डॉ. बापू चंदनशिवे यांनी सांगितले. अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाच्या सोलापूर जिल्हा शाखेने आयोजित केलेल्या वृत्तलेखन कार्यशाळा या उपक्रमात ते बोलत होते.

जिल्ह्यातील पत्रकारांच्या लेखणीला आणखी धार चढावी, त्यांच्या वृत्तलेखनात कौशल्य पूर्ण विकास व्हावा, यासाठी अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व पत्रकारांसाठी मोफत वृत्तलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील मास कम्युनिकेशन विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंबादास भासके आणि अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या मीडिया अँड मास कम्युनिकेशन विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. बापू चंदनशिवे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, राज्य तांत्रिक सल्लागार नागनाथ सुतार, सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी, जिल्हा कार्याध्यक्ष तानाजी जाधव, शहराध्यक्ष सोहन जयस्वाल, तालुकाध्यक्ष नामदेव लकडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष अपराजित सर्वगोड, नगरसेवक दीपक चंदनशिवे, आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

सुरुवातीला श्री विठ्ठल आणि आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांचे झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांचे सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने स्वागत करण्यात आले. संघटनेच्या वतीने पत्रकारांसाठी राबविण्यात आलेले आरोग्य शिबिर, प्रशिक्षण कार्यक्रम, याचबरोबर विविध उपक्रमांची माहिती, या वृत्तलेखन कार्यशाळेची भूमिका जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी आपल्या प्रास्ताविकातून विशद केली. त्यानंतर वृत्तलेखन कार्यशाळेला सुरुवात झाली.

या कार्यशाळेला जिल्हाभरातून पत्रकारांचा अतिशय उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. दोन्ही प्रमुख मार्गदर्शक यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. समोर उपस्थित पत्रकार यांनी देखील त्यांचे महत्त्वाचे मुद्दे नोंद करून घेत आपल्या ज्ञानात भर घातली. व्याख्यानानंतर उपस्थित पत्रकारांच्या शंका आणि प्रश्नांना प्रमुख मार्गदर्शकांनी खुलेपणाने उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

संघाचे जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रशांत माळवदे यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे अतिशय बहारदार सुत्रसंचलन केले.


कार्यशाळेच्या शेवटी दोन्ही प्रमुख मार्गदर्शकांना डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघाच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तर कार्यशाळेत सहभाग घेतलेल्या सर्व पत्रकारांना प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देण्यात आले. पत्रकारांच्या लेखणीला कौशल्य आणि गुणवत्तेचे बळ देण्यासाठी आयोजित केलेल्या वृत्तलेखन कार्यशाळा या अनोख्या उपक्रमाबद्दल अखिल भारतीय संपादक पत्रकार संघाच्या सोलापूर शाखेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### नळदुर्ग येथे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन संपन्न

# सामाजिक बांधिलकी स्वयंसेवेचे मुल्य आणि व्यसनमुक्त विद्यार्थी बनला पाहिजे : प्राचार्य राठोड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : काही चळवळी काही योजना भविष्याला आणि आयुष्याला जीवन देणाऱ्या असतात राष्ट्रीय सेवा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू व्हावा एन एस एस मध्ये शिस्तीला खूप महत्त्व आहे सध्या केवळ राज्यातच नव्हे पूर्ण देशांमध्ये माणुसकी स्वावलंबन देशभक्त अदिनिती मूल्यांची शिकवण दिली जाते निर्व्यसणी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांचा कार्यानुभव शारीरिक शिक्षण तनाने आणी मनाने विद्यार्थी घडला पाहिजे.





राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व, सामाजिक बांधिलकी, मूल्य आणि व्यसनमुक्तीचा संदेश सामाजिक सामाजिक जाणीव विद्यार्थ्यांचे नेतृत्व गुण आणि सेवाभाव विकसित होतो विद्यार्थ्यांनी समाजहिताच्याक्रमामध्ये सहभागी हो राष्ट्राच्या विकासात योगदान द्यावे शिवाय विद्यार्थ्यां पर्यंत हा संदेश पोहोचण्यासाठी आजचा प्राध्यापक वर्ग तयार आहे परंतू विद्यार्थी हा व्यसनाधीन होत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्येसनाधिन न होता फक्त अभ्यासाकडे लक्ष देण्याची गरज आहे , कारण आजचा विद्यार्थी उद्याचा देशाचा भविष्य आहे विद्यार्थ्यांचे शिक्षण होणे खूप महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांना फक्त शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्राध्यापक वर्ग प्रामाणिक प्रयत्न करत आहेत असे प्रतिपादन बालाघाट शिक्षण संस्था संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड यांनी केले.

नळदुर्ग येथे कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयांत राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

प्रथमता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ सुभाष राठोड व मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बृहस्पती वाघमारे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला प्रा. डॉ. हाशमबेग मिर्झा, प्रा. डॉ. तुळशीराम दबडे, प्रा. डॉ. लक्ष्मण शिटे (छडड कार्यक्रम अधिकारी), प्रा. डॉ. निलेश शेरे, प्रा. बाबासाहेब सावते (छडड कार्यक्रम अधिकारी), प्रा. डॉ. अतिश तिडके, प्रा. अकबर सय्यद आणि प्रा. संग्राम जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रा बाबासाहेब सावते यांनी उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. व्यसनांपासून दूर राहून निरोगी आणि जबाबदार जीवन जगण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. बृहस्पती वाघमारे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक गण मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble


■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नव्या आयुष्याची सुरुवात : पंढरपूरच्या १५ वर्षीय आदित्यवर फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे यशस्वी हृदय प्रत्यारोपण

## जवळपास तीन वर्षे गंभीर हृदयविकाराशी झुंज देणाऱ्या आदित्यची प्रत्यारोपणानंतर प्रकृती सुधारली; लवकरच पुन्हा शाळेत जाण्याची तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथील हृदय प्रत्यारोपण तज्ज्ञांनी १७ जुलै २०२६ रोजी २०२६ मधील पहिले बाल हृदय प्रत्यारोपण यशस्वीपणे केले. या प्रत्यारोपणामुळे महाराष्ट्रातील पंढरपूर येथील १५ वर्षीय आदित्य जाधव याला नवजीवन मिळाले. इयत्ता नववीत शिकणाऱ्या आदित्यला जवळपास तीन वर्षांपासून गंभीर हृदयविकाराच्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. प्रत्यारोपणानंतर प्रकृतीत चांगली सुधारणा झाल्यानंतर त्याला ३१ ऑगस्ट २०२६ रोजी घरी सोडण्यात आले. फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या बाल हृदयरोग विभागाच्या संचालक डॉ. स्नेहल कुलकर्णी यांच्या देखरेखीखाली त्याच्यावर उपचार करण्यात आले. हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडचे हृदय व छातीच्या शस्त्रक्रिया विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. धनंजय मालनकर आणि त्यांच्या टीमने केली. आदित्यची प्रकृती आता चांगली असून येत्या काही आठवड्यांत तो पुन्हा शाळेत जाण्याची शक्यता आहे.



गेल्या जवळपास तीन वर्षांपासून आदित्यला वारंवार आजारी पडणे, थोडीशी हालचाल केली तरी दम लागणे, अचानक हृदयाचे ठोके वाढणे आणि पायांना सूज येणे अशा त्रासांना सामोरे जावे लागत होते. हळूहळू या त्रासाचा त्याच्या दैनंदिन जीवनावर आणि शाळेत जाण्यावर परिणाम होऊ लागला. त्यामुळे त्याचे अनेक दिवस शाळेत जाणे चुकले, मात्र त्याने शिक्षण सोडले नाही आणि घरी राहून अभ्यास सुरू ठेवला.

त्रास सुरूच राहिल्याने मुंबईत पुढील उपचारांसाठी येण्यापूर्वी पंढरपूर येथे डॉ. ओजस देवकाटे यांनी आदित्यची तपासणी केली. फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे तपासणी केल्यानंतर त्याच्या हृदयाच्या उजव्या बाजूला गंभीर समस्या असल्याचे आढळले. हृदयातील एका झडपेत मोठ्या प्रमाणात गळती, हृदयाच्या उजव्या बाजूचे कप्पे वाढणे आणि हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे आढळले.

३ एप्रिल रोजी आपला १५ वा वाढदिवस साजरा करणाऱ्या आदित्यला मित्रांसोबत क्रिकेट खेळण्याची खूप आवड आहे. मात्र प्रकृती बिघडत गेल्याने त्याला क्रिकेट खेळणे सोडावे लागले. ३१ ऑगस्ट रोजी रुग्णालयातून घरी गेल्यानंतर त्याला पुन्हा क्रिकेट खेळण्याची उत्सुकता होती. मात्र सध्या विश्रांती आणि प्रकृती सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला त्याच्या पालकांनी त्याला दिला आहे. आजारामुळे अनेक वर्षे आपल्या आवडत्या गोष्टींपासून दूर राहिलेल्या आदित्यसाठी पुन्हा मित्रांसोबत क्रिकेट खेळण्याची आशा ही त्याच्या नव्या आयुष्याचा आनंद देणारी बाब ठरली आहे.

दोन वर्षांपूर्वी आदित्यला हृदयातील एका झडपेत गळती आणि हृदयाच्या कप्प्यांचा आकार वाढल्यामुळे फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे दाखल करण्यात आले होते. त्याच्यावर हृदयाच्या झडपेची दुरुस्ती करण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर झडप व्यवस्थित काम करत असतानाही त्याचे हृदय वाढतच राहिले. त्याच्या पायांवर आणि चेहऱ्यावर सूज येत होती तसेच अधूनमधून हृदयाचे ठोके अनियमितपणे वाढत होते.

यानंतर त्याची हृदयाच्या स्नायूंच्या आजारासाठी तपासणी करण्यात आली. एमआरआय तपासणीत त्याला हृदयाच्या उजव्या कप्प्याच्या स्नायूंशी संबंधित गंभीर आजार असल्याचे निदान झाले. प्रकृतीचा त्याच्या आरोग्यावर आणि दैनंदिन जीवनावर होत असलेला परिणाम लक्षात घेऊन डॉक्टरांनी हृदय प्रत्यारोपण हा योग्य पर्याय असल्याचे सांगितले. आवश्यक तपासण्या पूर्ण केल्यानंतर २० फेब्रुवारी २०२६ रोजी आदित्यचे नाव फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या हृदय प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षा यादीत नोंदवण्यात आले. दाता हृदय उपलब्ध होताच उपचारात विलंब होऊ नये यासाठी त्याला रुग्णालयाच्या जवळ राहण्याचा सल्ला देण्यात आला.योग्य दात्याची प्रतीक्षा करणे आदित्य आणि त्याच्या कुटुंबासाठी अत्यंत कठीण होते. त्याचे वडील रिक्षा चालवतात आणि ते कुटुंबातील एकमेव कमवते सदस्य आहेत, तर आई गृहिणी आहे. आदित्य पंढरपूरमध्ये आई-वडील आणि दोन मोठ्या बहिणींसोबत राहतो. मुंबईला तातडीने पोहोचता यावे आणि दाता हृदय उपलब्ध झाल्यास वेळ वाया जाऊ नये यासाठी कुटुंबाने काही महिन्यांसाठी पुण्यात स्थलांतर केले. वाशी, नवी मुंबई येथील एमजीएम न्यू बॉम्बे हॉस्पिटलमध्ये २२ वर्षीय तरुणीला मेंदू मृत घोषित करण्यात आल्यानंतर आदित्यसाठी योग्य दाता हृदय उपलब्ध झाले. आपल्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही दात्याच्या कुटुंबाने हृदय, फुफ्फुसे, मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड, आतडी आणि रक्तवाहिन्या दान करण्यास संमती दिली. त्यांच्या या निर्णयामुळे अनेक रुग्णांना नवजीवनाची संधी मिळाली.

दाता आणि रुग्णालयांमधील समन्वय, मुंबईतील अवयव प्रत्यारोपणाशी संबंधित यंत्रणा, अवयव काढणे आणि प्रत्यारोपण करणाऱ्या वैद्यकीय टीम, वाहतूक विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांच्या सहकार्यामुळे दाता हृदय तातडीने फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड येथे पोहोचवणे शक्य झाले. फोर्टिसच्या हृदय शल्यचिकित्सक, हृदयरोग तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, अतिदक्षता विभागातील तज्ज्ञ, प्रत्यारोपण तज्ज्ञ, परिचारिका आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आदित्यचे प्रत्यारोपण आणि त्यानंतरची प्रकृती सुधारण्याची प्रक्रिया यशस्वी झाली.

१७ जुलै २०२६ रोजी आदित्यवर यशस्वीपणे हृदय प्रत्यारोपण करण्यात आले. त्यानंतर त्याची प्रकृती हळूहळू सुधारत गेली. प्रत्यारोपणानंतर आता त्याची प्रकृती चांगली आहे. दोन महिन्यांहून अधिक काळ लोटल्यानंतर तो आता चांगल्या प्रकृतीत आहे. पुन्हा शाळेत जाण्याची आणि पूर्वी आवडणाऱ्या गोष्टी हळूहळू सुरू करण्याची त्याला उत्सुकता आहे. सध्या त्याच्या कुटुंबीयांनी त्याला घाई न करता पूर्ण विश्रांती घ्यायचा सल्ला दिला आहे. मात्र, पुन्हा मित्रांसोबत क्रिकेट खेळण्याचा विचारच त्याच्यासाठी आजारापूर्वीचे साधे आणि आनंदी आयुष्य परत मिळवण्याची आशा देणारा आहे.

उपचारांबाबत बोलताना फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या बाल हृदयरोग विभागाच्या संचालक डॉ. स्नेहल कुलकर्णी म्हणाल्या, आदित्यचा प्रवास दाखवून देतो की मुलांमधील हृदयविकाराचे लवकर निदान आणि योग्य वेळी उपचार किती महत्त्वाचे असतात. मुलांमध्ये हृदयाची कार्यक्षमता कमी होण्याची लक्षणे अनेकदा वारंवार होणारे संसर्ग किंवा सामान्य थकवा समजून दुर्लक्षित केली जातात. त्यामुळे निदान होईपर्यंत उपचाराचे पर्याय मर्यादित होऊ शकतात. योग्य वेळी उपचार मिळाल्यास औषधोपचार, हृदयाच्या झडपेची दुरुस्ती किंवा गरज भासल्यास हृदय प्रत्यारोपणाच्या माध्यमातून मुलांना पुन्हा केवळ आरोग्यच नाही, तर त्यांचे बालपणही अनुभवण्याची संधी मिळू शकते.

आदित्यच्या कुटुंबासाठी हे प्रत्यारोपण अनेक महिन्यांच्या चिंता, त्याग आणि संघर्षानंतर मिळालेले समाधान आहे. अनेक दात्यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे उपचारांचा खर्च सांभाळणे कुटुंबाला शक्य झाले. प्रत्यारोपण शल्यचिकित्सक आणि फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडचे हृदय व छातीच्या शस्त्रक्रिया विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. धनंजय मालनकर म्हणाले, आदित्यच्या उपचारातील वैद्यकीय आव्हानांपेक्षा त्याचा सकारात्मक दृष्टिकोन आमच्या लक्षात राहिला. तो उत्तम चित्र काढतो. अतिदक्षता विभागात कृत्रिम श्वसनयंत्राचा आधार काढल्यानंतर काही वेळातच तो भगवान विठ्ठल आणि गणपतीची चित्रे काढण्यात मग्न झाला होता. त्याची श्रद्धा आणि एकाग्रतेने त्याच्या शस्त्रक्रियेनंतरच्या प्रकृती सुधारण्यातही सकारात्मक भूमिका बजावली असावी.

फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंडच्या सुविधा संचालिका सुश्री रिंकू मवानी म्हणाल्या, हे यश तरुण रुग्णांमधील गुंतागुंतीच्या हृदयविकारांवर उपचार करण्यासाठी आमच्या विविध विभागांच्या तज्ज्ञ टीमची क्षमता दाखवते. स्वतःच्या दुःखाच्या काळातही अवयवदानाचा निर्णय घेणाऱ्या दात्याच्या कुटुंबाचे आम्ही मनापासून आभारी आहोत. अधिकाधिक रुग्णांना विशेष प्रत्यारोपण उपचार मिळावेत आणि त्यांना निरोगी आयुष्य जगण्याची संधी मिळावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत राहू.

---

## पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांची विधानसभा लढण्याचे संकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : सत्तेत घुसमट होत असल्याचे सांगत डॉक्टर अनिता भालके यांनी विधानसभा लढण्याची संकेत दिले आहेत म्हणाले की तुम्ही सोबत असाल तर माझी तयारी आहे. मंगळवेढ्यात शेतकऱ्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नावर संघर्ष सुरू असल्याची नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांनी सांगितले सत्तेत असूनही जनतेच्या समस्यामुळे घुसमट होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान सर्वसामान्यप्रमाणे संघर्ष करून मंगळवेढा ला न्याय देण्याची ताकद तुमच्यात आहे त्यामुळे भविष्यात तुम्ही या भागात नेतृत्व करावे असे साखरे उपस्थित आणि डॉक्टर अनिता भालके यांना घातले त्यावर तुम्ही बरोबर असाल तर माझी लढण्याची तयारी असेही सांगून प्रणिता भालकेने विधानसभा लढण्याची संकेत दिल्याची मानली जात आहे.

यान सासऱ्याप्रमाणे संघर्ष करून मंगळवेढ्याला न्याय देण्याची ताकद तुमच्यात आहे. त्यामुळे भविष्यात तुम्ही या बाबाजी नेतृत्व करावे अशी साखळी उपस्थित आणि डॉक्टर पणे ते भालके यांना घातले यावर तुम्ही बरोबर असाल तर माझी लढण्याची तयारी अशी सांगून पालखी यांनी दिलेली आहे.

तालुक्यातील वळसंगी येथील राजमाता गणेश मंडळाची आरती नंतर नगराध्यक्ष प्रणिता भालके यांनी उपस्थित अशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी वरील संख्येत दिल्या यावेळी दामाजी कारखान्याची माजी संचालक पांडुरंग चौगुले, नामदेव वरकुटे, पांडुरंग मुरकुटे संभाजी वरकुटे, महादेव वरकुटे सर्जेराव कोळेकर रामचंद्र वरकुटे आधी सह्या भागातील तरुण व महिला उपस्थित होत्या.

---

## मंगळवेढ्यात सराफ दुकानातून २५ लाखाचे सोने घेऊन पश्चिम बंगालचे दोन कामगार फरार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मंगळवेढा शहरात पश्चिम बंगालच्या दोन आरोपींनी बालाजी ज्वेलर्स मध्ये २५ लाखाच्या सोन्याचा आभार करून कोबारा केल्याची घटना घडली असून या घटनेचे शहरांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे याप्रकरणी शहाबुद्दीन रहीमलाल, हिसाबुद्दीन रहीमला लाख(पश्चिम बंगाल) या दोघा भावा विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस सूत्राने दिलेली माहिती अशी यातील फिर्यादी दिलीप घाडगे यांचे मंगळवेढा शहरात बालाजी नावाची दुकान असून या दुकानात वरील दोघे आरोपी कामगार म्हणून काम पाहत होती दिनांक ११ सप्टेंबर रोजी दोन्ही आमदारांनी आपला मोबाईल बंद ठेवला होता व त्याचा शोध घेतला असता ते मंगळवेढ्यात मिळून आले आहेत या दोघांची फिर्यादीचे विश्वासाने सत्रात ओळी शिवणे व २५ लाखाचे दिले होते व यांनी संगणमत करून दिलेले सोन्याचे दागिने बनवून न देता विश्वासघात करून २५ लाखाचा आभार केला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे दरम्यान या घटनेमुळे शहरातील सराफ बाजारात मोठी खळबळ उडाली आहे याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बाबर हे करीत आहेत.

---

## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर सर यांचा संत नगरी शेगांव मध्ये यथोचित सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




कळंब : प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते परिषदेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर सर यांचा संत नगरी शेगांव मध्ये यथोचित सत्कार करण्यात आला.बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ, शेगाव तालुका पत्रकार संघ आणि शेगाव तालुका डिजिटल मिडिया परिषदेच्या संयुक्त विद्यमाने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ शनिवार रोजी सायंकाळी ५: ३० वाजता मा.श्री. एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास विश्वस्त शरद पाबळे, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे,डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, चंद्रकांत क्षीरसागर, विश्वंभर मुळे सह आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेगांव तालुका अध्यक्ष नंदुभाऊ कुलकर्णी,कार्याध्यक्ष राजकुमार व्यास, सचिव नितीन घरडे, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष विवेक शेगावकर, तसेच स्वागताध्यक्ष तथा डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, जिल्हा संघटक राजेश चौधरी, धनराज ससाणे, नारायण दाभाडे सह आदींनी परिश्रम घेतले.

---

### ज्ञानयात्री डॉ. रोंगे सरांनी पुण्यातील शिक्षकांच्या जाणून घेतल्या समस्या

## शिक्षण पंढरीत स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांना उत्तम प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया महिन्यावर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमामुळे राज्यात ज्ञानयात्री म्हणून ओळख झालेल्या स्वेरीचे डॉ. बी. पी. रोंगे सर हे पुणे जिल्ह्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्याला पुण्यातूनही प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे, ही भावना शिक्षकांची झाली आहे.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. डॉ. रोंगे सर यांनी गेल्या वर्षापासून पुणे विभाग मतदार संघातील सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे व सोलापूर या पाचही जिल्ह्यांतील शाळा व कॉलेज मधील पदाधिकारी व शिक्षकांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे.

या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे, हे मात्र वाढत्या प्रतिसादावरून समजते. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी डॉ. रोंगे सरांचे कमालीचे स्वागत करत आहेत. मागील उमेदवारांनी फारसे काहीही केले नसल्याची भूमिका घेत आता डॉ. रोंगे सरांमुळे उत्साह वाढल्याचे दिसत आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या आठवड्यात पुणे जिल्ह्यातील १२ तालुक्यातील शाळांना भेट देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी ज्ञानमंदिर हायस्कूल व ज्युनियर कॉलेज आळे, ग्रामोन्नती शिक्षण मंडळ अंतर्गत सर्व महाविद्यालय, स्कूल, ग्रामविकास प्रतिष्ठान अंतर्गत सर्व महाविद्यालये, समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट बेल्हे, सह्याद्री व्हॅली कॉलेज राजुरी, जयहिंद महाविद्यालय, नारायणगाव यासह इतर शाळा व महाविद्यालय यांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. वास्तविक पाहता आमदार होण्यापूर्वीच डॉ. रोंगे सरांनी सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील एकूण २७ मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लावला आहे. त्याचबरोबर सोलापूर जिल्हा सेवा अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिले होते. त्या अनुषंगाने त्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी संतोष साखरे यांच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. बभ्रुवाहन रोंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती, नियुक्ती व सेवा विषयक एकूण ३७ प्रकरणे सोडवली गेली आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आहे. या प्रकरणांच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने कार्यवाही करत एकाच दिवसात ३७ प्रकरणांची सोडवणूक करून न्याय दिला आहे. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या कारणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी धाराशिव जिल्हा दौऱ्यात शेतकऱ्यांना दिला दिलासा

## खानापूर व नळदुर्ग येथे दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांशी साधला संवाद; आपल्या व्यथा, वेदना शासन दरबारी मांडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे आमदार तथा माजी मंत्री युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी खानापूर व नळदुर्ग ता. तुळजापूर आणि परिसरातील दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांसी संवाद साधुन शिवसेना आपल्या पाठीशी खंबीर पणे उभे राहून आपल्या व्यथा आणि वेदना शासन दरबारीं मांडून दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयन्त करणार असे सांगून कोणी ही अत्महत्या करू नका निराश होऊ नका शिवसेना (उबाठा) आपल्या पाठीशी आहे. अशा प्रकारे दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला.





दि.२६ सप्टेंबर २२६ रोजी शिव सेना (उबाठा ) चे आमदार तथा माजी मंत्री यूवा सेना प्रमुख अदित्य ठाकरे हे धाराशिव जिल्ह्यातील दुकाळ ग्रस्त भागाची पहाणी करण्यासाठी जिल्हा दौऱ्यावर आले असता तुळजापूर तालूक्यातील खानापूर येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जावून शेती पीकांच्या नुकसानीची पहाणी करून खानापूर व परिसरातून आलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून वरिल प्रमाणे दिलासा दिला.

या वेळी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे,शिवसेना प्रवक्ते अतुल भोवर,शिवसेना आमदार प्रवीण स्वामी,शिव सेना (उबाठा) जिल्हा प्रमुख तथा आमदार कैलास पाटील, ग्रामीण जिल्हा प्रमुख रणजीत पाटील,जिल्हा उपप्रमुख बसवराज वरनाळे जि.प. सदस्य डॉ.जितेंद्र कानडे, तुळजापूर तालुका प्रमुख जगन्नाथ गवळी,सह दुष्काळग्रस्त शेतकरी, ग्रामस्थ शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर नळदुर्ग येथेही खंडोबा मंदिरा जवळ राष्ट्रीय महामार्ग ६५ वर शिव सेना कार्यकर्ते व दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्याना आमदार आदित्य ठाकरे यांनी धावती भेट दिली. या वेळी दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्याना शासनाने सरसकट हेक्टरी एक लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी या प्रमुख मागणी सह विविध मागण्याचे निवेदन शेतकरी संघर्ष समिती च्या वतीने अदित्य ठाकरे याना देण्यात आले.यावेळी शिव सेना (उबाठा) चे जिल्हा नेते कमलाकर काका चव्हाण, तालुका उपप्रमुख सरदारसिंग ठाकूर,शहराध्यक्ष संतोष पुदाले,शाम कणकधर, दत्तात्रय वाघमारे सर,शेतकरी संघर्ष समिती चे दिलीप जोशी पंडित पाटील महेश घोडके अजमुद्दीन शेख रहमान शेख बालाजी ठाकूर काशिनाथ काळे बंडू मोरे श्रीकांत पोतदार,सोमनाथ म्हेत्रे,प्रसाद भोसले सह दुष्काळग्रस्त शेतकरी उपस्थित होते.



# निफाड तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करा : साहेबराव ढोमसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड हिंदूसम्राट प्रतिनिधी राजेंद्र थोरात. :- मागील वर्षी अतिवृष्टीमुळे द्राक्षबागांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीतून शेतकरी अद्याप सावरलेला नसताना यंदा पावसाने दडी मारल्याने मका, सोयाबीनसह अनेक उभी पिके पाण्याअभावी जळून जाण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे निफाड तालुक्याचा तात्काळ दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष साहेबराव पाटील ढोमसे यांनी केली आहे.

तालुक्यातील द्राक्षबागांनाही पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पालखेड धरणाच्या कालव्याचे आवर्तन काही दिवस मिळत असले तरी त्यावर संपूर्ण हंगाम अवलंबून राहणे शक्य नाही. पाण्याअभावी पिकांचे होणारे नुकसान आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट निमाण झाले असल्याचे ढोमसे यांनी म्हटले आहे.प्रशासनाने केवळ कागदावरील आकडेवारीच्या आधारे निर्णय न घेता निफाड तालुक्यातील प्रत्येक मंडळाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रत्येक मंडळातील पिकांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि दुष्काळी परिस्थिती यांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या दुष्काळी निकषांनुसार तालुक्याचे फेरमूल्यांकन करावे, असे त्यांनी सांगितले.निफाडचे आमदार दिलीप बनकर यांनी या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन तहसीलदारांना आवश्यक आदेश द्यावेत. तहसीलदारांनी संबंधित मंडळाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणीचे आदेश देऊन तालुक्यातील वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, अशी मागणीही साहेबराव ढोमसे यांनी केली.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या –**

**निफाड तालुक्याचा तात्काळ दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा.**

**प्रत्येक मंडळाची प्रत्यक्ष पाहणी करून दुष्काळी परिस्थितीचे फेरमूल्यांकन करावे.**

**शासनाच्या दुष्काळी निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी.**

# निरडवलेले महसूल प्रशासन आणि हातबल झालेला शेतकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मौजे तरडगाव तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर या ठिकाणी गट नंबर ४६ ते ५१ क्षेत्राची मोजणी करावी म्हणून गेली आठ वर्षांपासून पंढरपूर भूमी अभिलेख तसेच तहसीलदार सोलापूर भूमी अभिलेख यांच्याकडे मोजणी प्रस्ताव रस्ता केस दाखल आहे. तरडगाव या ठिकाणी वन विभागाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे या भागात ४६ ते ५१ गट नंबर चे क्षेत्र एकत्रीकरणात असून त्या ठिकाणी मोजणी करून मिळावे सातबारा सदरी नोंदी कराव्यात म्हणून कुंडलिक रंगनाथ कांबळे, व हनुमंत रंगनाथ कांबळे, नारायण एकनाथ कांबळे, संभाजी एकनाथ कांबळे, यांनी गेले सात वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी सोलापूर तसेच भुमिअभिलेख यांच्याकडे तसेच तहसीलदार यांच्याकडे दावे दाखल आहेत सदरचा दाव्याला दिवाणी कोर्टाचे स्वरूप आले असून महसूल प्रशासन तारीख पे तारीख देत आहे म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या न्यायालयात ६७५/२०२५ अनुसार अपील दावा सुरू आहे सदर दावा लवकर चालवून न्याय मिळावा म्हणून पंढरपूरहुन प्रत्येक महिन्याला मंत्रालयात हेलपाटे घालावी लागत आहेत गेले आणि वर्षापासून अपेक्षित शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. न्यायासाठी हातबल झालेला शेतकरी हा जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर तहसील कार्यालय पंढरपूर तसेच मुंबई मंत्रालयात खेटे घालताना दिसत आहेत तरडगाव या ठिकाणी गणेशा बाई कुंडलिक कांबळे यांचा पारंपारिक रस्ता २०० षीं अडवला आहे हा रस्ता पुणे शेतकऱ्यांच्या मालकीचा नाही तो पाटबंधारे विभागाच्या अतिरिक्त आहे. बेकायदेशीर रस्ता अडवणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणतीही कारवाई करत नाहीत या उलट दगच्या शेतकऱ्यांबरोबर वाद लावून मजा बघत आहे यामध्ये पंढरपूर तहसीलदार पाटबंधारे विभागाला नोटीस न करता शेतकऱ्यांना नोटीस पाठवून रस्ता केसला दिवाणी न्यायालयाच्या स्वरूपामध्ये तारीख पे तारीख देऊन विलंब लावत आहे सदर रस्त्याची स्थळ पाणी पंचनामे झाली तरी देखील तूर्तास अडवलेला रस्ता खुला करून मिळत नाही त्यामुळे कुंडलिक कांबळे या शेतकऱ्यांची चारी बाजूने कोंडी झाल्यामुळे त्याला दुसऱ्याच्या बांधावरून ये जा करावी लागत आहे.

संपूर्ण हकीगत पुराव्यानेशी मांडूनही महसूल प्रशासनाला जाग येत नाही अथवा शेतकऱ्यांची क्यू येत नाही.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी पत्र देऊनही जिल्हाधिकारी यांचा तालुका प्रशासकीय अधिकारी कोणतीही अंकुश नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाला केराची टोपली दाखवून शेतकऱ्यांची अवहेलना केली जात आहे.

नेहा साठी हात बंद झालेला शेतकऱ्यांना महसूल मंत्री न्याय देतील का महसूल प्रशासनावर बचत ठेवतील का? वेळेत शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा निपटारा होईल का असा प्रश्न सोलापूर जिल्ह्यात उपस्थित झाला आहे.

# विद्यार्थी साहिल वाकोडे मृत्यू प्रकरणाची सर्वंकष चौकशी करून कारवाई करण्याची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विजय शंकर घनगाव/मुंबई : आयआयटी मुंबई (पवई) येथील द्वितीय वर्षाचा SC प्रवर्गातील विद्यार्थी साहिल रवींद्र वाकोडे यांच्या मृत्यू प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि सर्वंकष चौकशी करण्यात यावी. तसेच संस्थेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील प्राध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, अशी मागणी मी केली आहे.

साहिल वाकोडे यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर आयआयटी मुंबईच्या संचालकांसह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या चर्चेत प्राध्यापकांची रिक्त पदे, SC-ST-OBC प्रतिनिधित्व, विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी सुविधा, वसतिगृह व्यवस्था, Students' Wellness Centre, तक्रार निवारण यंत्रणा आणि मानसिक आरोग्याशी संबंधित प्रश्न यांचा आढावा घेतला.

साहिलच्या कुटुंबीयांनी जातीय भेदभाव आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागल्याचा गंभीर आरोप केला आहे. या तक्रारीनंतर पवई पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींसह SC/ST (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यानुसार गुन्हा नोंदविला आहे. प्रकरण आता मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे वर्ग झाले असून CP दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत, DCP Detection-I यांच्या देखरेखीखाली तपास सुरू आहे.

कुटुंबीयांच्या तक्रारीतील आरोप आणि परिस्थितीजन्य बाबी गंभीर आहेत. त्यांची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. तथापि अंतिम निष्कर्ष पोलीस तपास, उपलब्ध पुरावे आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच समोर यावा. केवळ संबंधित व्यक्ती आरक्षित प्रवर्गातील आहे म्हणून अत्याचार प्रतिबंधक कायदा आपोआप लागू होत नाही; तक्रारीत नमूद केलेल्या कृत्यांचा आणि कायद्यातील आवश्यक घटकांचा तपास महत्त्वाचा ठरतो.

साहिलच्या मृत्यूपूर्वीचा संपूर्ण घटनाक्रम तपास यंत्रणांनी बारकाईने पडताळावा. कुटुंबीयांशी झालेले संभाषण, मोबाइल फोन, डिजिटल संदेश, ई-मेल, कॉल रेकॉर्ड, CCTV फुटेज, परीक्षा कक्षातील घटनाक्रम, सहविद्यार्थी व प्राध्यापकांचे जबाब आणि अन्य परिस्थितीजन्य पुरावे एकत्रितपणे तपासावेत. एखाद्या एका घटनेवर निष्कर्ष काढू नये. कोणतीही बाब दुर्लक्षित राहता कामा नये.

आयआयटी मुंबईने अंतर्गत चौकशी करताना कुटुंबीयांना आपले म्हणणे मांडण्याची आणि पुरावे सादर करण्याची पूर्ण संधी दिली पाहिजे. तक्रारदाराचे म्हणणे न ऐकता चौकशी पूर्ण झाली, तर तिच्या सर्वसमावेशकतेबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार सर्व संबंधित पक्षांना समान संधी मिळाली पाहिजे. आयआयटी मुंबईने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाला नोव्हेंबर २०२४ मध्ये दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी एकूण १,२२५ मंजूर प्राध्यापक पदांपैकी ७४२ पदे भरली होती, तर ४८३ पदे रिक्त होती. रिक्त पदे भरताना SC, ST आणि OBC यांचे निर्धारित प्रतिनिधित्व पूर्ण होऊ शकले नसल्याचे संस्थेने नमूद केले होते. राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेत ही पदे दीर्घकाळ रिक्त राहणे चिंतेची बाब आहे. पात्र उमेदवार मिळविण्यासाठी विशेष भरती मोहीम राबवावी आणि संविधानिक आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी. वंचित प्रवर्गातील पात्र प्राध्यापकांचे पुरेसे प्रतिनिधित्व विद्यार्थ्यांसाठी संवाद, विश्वास, शैक्षणिक मार्गदर्शन आणि संस्थेशी जोडलेपणाचे अधिक सकारात्मक वातावरण निर्माण करू शकते.

Hostel Affairs Council च्या माहितीनुसार परिसरात २१ निवासी हॉस्टेल्स असून १३,००० हून अधिक निवासी विद्यार्थी आहेत. एवढ्या मोठ्या समुदायासाठी मानसिक आरोग्य सेवा, समुपदेशन, तक्रार निवारण आणि आपत्कालीन सहाय्य अत्यंत सक्षम असणे आवश्यक आहे. Students' Wellness Centre अधिक प्रभावी करावे, प्रशिक्षित समुपदेशक वाढवावेत, SC/ST Cell अधिक सक्रिय करावे आणि विद्यार्थ्यांसाठी सुलभ, गोपनीय व विश्वासार्ह तक्रार व्यवस्था निर्माण करावी. भेदभाव किंवा छळाबाबत भीतीशिवाय तक्रार करता यावी आणि निश्चित कालमर्यादेत कार्यवाही व्हावी.

साहिल वाकोडे यांच्या मृत्यूमागील सत्य समोर आले पाहिजे आणि त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे. पोलिस तपास कायद्यानुसार सुरू राहील; मात्र या घटनेशी संबंधित संस्थात्मक बाबींचीही स्वतंत्र, पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणाच्या गंभीरतेबाबत मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सखोल चौकशीची मागणी करणार आहे. FIR मधील आरोप, कुटुंबीयांचे म्हणणे, परिस्थितीजन्य पुरावे, CCTV, डिजिटल पुरावे, विद्यार्थी व प्राध्यापकांचे जबाब आणि प्रशासनाची बाजू या सर्वांचा एकत्रित व निष्पक्ष विचार करून वस्तुस्थिती समोर आणली पाहिजे.

**विसर्जन मिरवणूक; लहान मुलांचे मल्लखांब प्रात्यक्षिक ठरले आकर्षण**

# श्री गुरुदत्त शुगरच्या गणरायाला उत्साहात निरोप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी : श्री गुरुदत्त शुगर लिमिटेड, टाकळीवाडी यांच्या वतीने विराजमान करण्यात आलेल्या गणरायाला भक्तिमय वातावरणात उत्साहात निरोप देण्यात आला. गणेश विसर्जनानिमित्त आयोजित मिरवणुकीत ढोल-ताशांचा गजर, हालगी च्या तालावर तरुणांचा उत्साह आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निमर्ण झाले होते.

या विसर्जन मिरवणुकीचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांसाठी आयोजित करण्यात आलेली मल्लखांबाची प्रात्यक्षिके. चिमुकल्या मुलांनी मल्लखांबावर विविध कौशल्यपूर्ण कसरती व प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या धाडसी आणि चित्तथरारक प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

मिरवणुकीदरम्यान श्री गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. कंपनीचे अधिकारी, कर्मचारी, कामगार तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गणरायाला भावपूर्ण निरोप देताना भक्तांनी पुढील वर्षी लवकर येण्याची प्रार्थना केली.

या उपक्रमातून गणेशोत्सवाच्या आनंदासोबतच लहान मुलांच्या पारंपरिक क्रीडा-कौशल्याला व्यासपीठ मिळाले, याचे उपस्थितांनी कौतुक केले.

# तालुका कॅरम स्पर्धेत क्रिष्णा वारके प्रथम तर गुर्णव अंबादे व गुर्णव अंबादे द्वितीय क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





गोंदिया : अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, नंगपूरामुर्री ता. जि. गोंदिया येथील विद्यार्थी क्रिष्णा गोवर्धन वारके याने वयोगट १७ मध्ये तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच वयोगट १४ मधील अंतिम फेरीत स्मित मेश्राम व गुर्णव अंबादे या दोन विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

महाराष्ट्र राज्य शासन क्रीडा व शालेय शिक्षण विभाग संचालनालय द्वारे आयोजित गोंदिया तालुकास्तरावरीय कॅरम स्पर्धा क्रीडा संकुल, गोंदिया येथे आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथील शाळेतील क्रिष्णा वारके याने सर्व स्पर्धकांना हरवत जिल्हास्तरावर नाव कोरले आहे. तसेच वयोगट १४ मधील स्मित मेश्राम व गुर्णव अंबादे यांनी अंतिम फेरी खेडुन द्वितीय क्रमांक प्राप्त केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठुले, नीता भलमे, पुष्करराज लांजेवार, साधना पारधी, आशिष शहारे, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, मुन्नाभाई नंदागवळी, निशा गभणे, दीक्षा तुरकर तसेच संपूर्ण शाळेतील कर्मचारी वर्गानी हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

**जिल्हास्तरावर निवड : शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्रीचे सुयश**